कलम ४ (१) (ख) (२)

## पालघर पोलीस दला विषयी माहिती :-

शासन अधिसुचना महसूल व वन विभाग क्र.प्राफेब-११८/प्र.क्र..१६७/ठाणे म-१०,दि. ०७ जुन २०१४ अन्वये ठाणे जिल्हयाचे विभाजन करून पालघर हा नविन जिल्हा दि.०१.०८.२०१४ पासुन निर्माण करण्यात आलेला आहे. त्यानुसार गृह विभाग शासन निर्णय क्र..अेपीओ-०३१४/प्र.क्र.४७/पोल-३,दि.३१/०७/२०१४ अन्वये ठाणे ग्रामीण पोलीस दलाचे विभाजन होऊन पालघर जिल्हा पोलीस दल अस्तीत्वात आला.

पालघर जिल्हा हा महाराष्ट्रातील एक प्रगत औदयोगिक दृष्टया अग्रेसर तसेच भौगोलिक दृष्टया विशाल आणि आणि दुर्गम जिल्हा आहे. पालघरा जिल्हयाचे क्षेत्रफळ ५३४४ चौ.कि.मी.आहे. त्यांच्या सिमा खुष्कीच्या मार्गे,मुंबई,गुजरात,दादरा नगर हवेली,जव्हार मार्गे नाशिक या जिल्हयाशी सलग्न आहेत.सन २०११ च्या लोकसंख्येच्या जनगणनेनुसार ती संपुर्ण जिल्हयातील ६५ टक्के इतकी लोकसंख्या आहे. वाढत्या लोकसंख्येसोबत गुन्हेगारीत देखिल वाढ  झालेली दिसून येते.पालघर जिल्हयाला १०७ किलो मिटरचा विस्तीर्ण सागरी किनारा असल्यामुळे किनार पटटीच्या परिसरामध्ये तस्करी चोरटी आयात व समाजकंटकाच्या हालचालीची शक्यता नाकारता येत नाही. इकडील आस्थापनेवरील मंजुर मनुष्यबळ जिल्हयातील एकुण गुन्हेगारीची आकडेवारी व लोकसंख्या यांच्या प्रमाणात अत्यंत अपुरी आहे. या परिसरामध्ये मिश्र लोकवस्ती,परप्रांतीयांचे लोंढे आणि विविध जाती धर्माचे लोक राहत असल्यामुळे जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती नेहमीच उदभवते. या जिल्हयात आदीवासी भाग असून विविध भागात राजकीय पक्षाचे लोक असल्याने राजकीय तणावाची नेहमीच परिस्थिती उदभवते. व त्यामुळे जिल्हयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेवर शांतता व सुव्यवस्था राखणेकामी अवास्तव ताण पडत आहे.

नवनिर्मित पालघर जिल्हयात १.उपविभागीय अधिकारी कार्यालय,पालघर २. उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय,बोइसर ३. .उपविभागीय अधिकारी कार्यालय,डहाणु ४. .उपविभागीय अधिकारी कार्यालय,जव्हार ५. .उपविभागीय अधिकारी कार्यालय वसई ६. .उपविभागीय अधिकारी कार्यालय,नालासोपारा, ७. .उपविभागीय अधिकारी कार्यालय विरार असे एकुण ०७ उपविभागीय अधिकारी कार्यालये कार्यान्वीत होती.. तसेच त्यांच्या अधिपत्याखाली एकुण २३ पोलीस ठाणे कार्यरत होती. तदनंतर पुन्हा गृह विभाग शासन निर्णय क्र.०३१६/प्र.क्र..१०४/पोल-३,दि. १३ सप्टेंबर २०१९ अन्वये पोलीस आयुक्तालय,मिरा-भाईंदर-वसई-विरार ला मान्यता प्राप्त झाल्याने ठाणे ग्रामीण जिल्हा व पालघर जिल्हा पोलीस दलाचे विभाजन करण्यात आले. पालघर पोलीस दल विभाजनामध्ये वसई,विरार,नालासोपारा, असे ०३ उपविभागीय कार्यालये वर्ग झाले. विभाजनानंतर पालघर पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात ०४ उपविभागीय अधिकारी कार्यालये व १६ पोलीस ठाणे कार्यान्वीत आहेत.

कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्ह्याचा शोध करणे आणि गुन्हे टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे ही पोलिसांची मुख्य कामे आहेत. शिवाय गुन्हे टाळणे, गुन्हेगारावर खटले भरणे, कैद्यांना तसेच सरकारी तिजोरी, खाजगी किंवा सार्वजनिक मालमत्तेला संरक्षण देणे, वाहतूक सुव्यवस्था चालू ठेवणे, स्फोटक पदार्थांची तपासणी करणे, पूर्वचारित्र्य तपासून पाहणे ही महत्त्वाची कामेही पोलीस करतात. या व्यतिरिक्त सामाजिक, आर्थिक, विविधता कार्यान्वित करण्यासाठीसुध्दा पोलिसांना कामगिरी बजावावी लागते. ही सर्व कामे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांमार्फत पोलीस दल पार पाडते. या पोलीस दलाच्या नियंत्रण व प्रशासनाबाबतचे अधिकार,अंतर्गत अर्थव्यवस्था, सर्वसाधारण प्रशिक्षण, पोलीस दलामध्ये शिस्तपालन, तसेच त्यांची कार्यक्षमता राखणे यासाठी ते जबाबदार आहेत.

महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मध्ये पोलीस दलाचे कार्य,कर्तव्य आणि जबाबदा-या याबाबत सविस्तर रित्या नमुद करण्यात आलेले आहे. पोलीस अधीक्षक,पालघर पोलीस दलाकरीता पुढील प्रमाणे पोलीस अधिकारी व अंमलदार मंजूर आहेत.

## पोलीस अधीक्षक,पालघर चे आस्थापनेवरील मंजूर पदांबाबतची माहिती

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>पदनाम</th><th>पदसंख्या</th><th>पदनिर्मितीचा शासन निर्णय क्रमांक व दिनांक</th><th>देण्यात आल्याचा शासन निर्णय क्रमांक व दिनांक</th></tr>
<tr><td>१</td><td>पोलीस अधीक्षक</td><td>०१</td><td rowspan="23">महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.सीटीई-0522/प्र.क्र.48/पोल-3,दिनांक 30 जून 2023 अन्वये<br>२०५६ पदे</td><td rowspan="23">महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्रमांक सीटीई-३६१८/प्र.क्र.१५/पोल-३, दिनांक १५/०३/२०२४ अन्वये सर्व अस्थायी पदांना दिनांक ०१/०३/२०२४ ते ३१/०८/२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.</td></tr>
<tr><td>२</td><td>अपर पोलीस अधीक्षक</td><td>०१</td></tr>
<tr><td>३</td><td>पोलीस उप अधिक्षक</td><td>०६</td></tr>
<tr><td>४</td><td>पोलीस निरीक्षक</td><td>१२</td></tr>
<tr><td>५</td><td>राखीव पोलीस निरीक्षक</td><td>०१</td></tr>
<tr><td>६</td><td>सहायक पोलीस निरीक्षक</td><td>२६</td></tr>
<tr><td>७</td><td>पोलीस उप निरीक्षक</td><td>८६</td></tr>
<tr><td>८</td><td>राखीव पोलीस उपनिरीक्षक</td><td>०२</td></tr>
<tr><td>९</td><td>सहाय्यक पोलीस उप निरीक्षक</td><td>१८९</td></tr>
<tr><td>१०</td><td>पोलीस हवालदार</td><td>४३३</td></tr>
<tr><td>११</td><td>पोलीस शिपाई</td><td>१२४२</td></tr>
<tr><td>१२</td><td>पोलीस शिपाई चालक</td><td>०५</td></tr>
<tr><td>१३</td><td>कार्यालय अधीक्षक</td><td>०१</td></tr>
<tr><td>१४</td><td>सहायक लेखाधिकारी</td><td>०१</td></tr>
<tr><td>१५</td><td>स्थापत्य कनिष्ठ अभियंता</td><td>०१</td></tr>
<tr><td>१६</td><td>निम्मश्रेणी लघुलेखक</td><td>०१</td></tr>
<tr><td>१७</td><td>प्रमुख लिपिक</td><td>०३</td></tr>
<tr><td>१८</td><td>वरिष्ठ श्रेणी लिपिक</td><td>१०</td></tr>
<tr><td>१९</td><td>कनिष्ठ श्रेणी लिपिक</td><td>२७</td></tr>
<tr><td>२०</td><td>सहायक आचारी</td><td>०१</td></tr>
<tr><td>२१</td><td>भोजनालय सेवक</td><td>०१</td></tr>
<tr><td>२२</td><td>सफाईकामगार</td><td>०२</td></tr>
<tr><td>२३</td><td>कार्यालयीन शिपाई</td><td>०४</td></tr>
<tr><td>१</td><td>सहायक पोलीस निरीक्षक फस्टक्लास मास्टर</td><td>०३</td><td rowspan="8">महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.सीटीई-1222/प्र.क्र.129/पोल-3,दिनांक 18 ऑगस्ट 2023 अन्वये मोटार परिवून व नौका विभागाकरिता<br>७६ पदे</td><td rowspan="8">महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्रमांक पोलीस ३६१८/प्र.क्र. १५/पोल- ३ दिनांक १५/०३/२०२४ अन्वये सर्व अस्थायी पदांना दिनांक ०१/०३/२०२४ ते ३१/०८/२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.</td></tr>
<tr><td>२</td><td>पोलीस उप निरीक्षक सेकंड क्लास मास्टर</td><td>०३</td></tr>
<tr><td>३</td><td>पोलीस उप निरीक्षक फस्ट क्लास इंजिन ड्राव्हर</td><td>०७</td></tr>
<tr><td>४</td><td>सहायक पोलीस उप निरीक्षक सारंग</td><td>१०</td></tr>
<tr><td>५</td><td>सहा.पोलीस उप निरीक्षक इंजिन ड्रायव्हर</td><td>१२</td></tr>
<tr><td>६</td><td>पोलीस हवालदार खलाशी (डेसाईड)</td><td>०२</td></tr>
<tr><td>७</td><td>पोलीस शिपाई खलाशी (डेकसाईड)</td><td>१७</td></tr>
<tr><td>८</td><td>पोलीस शिपाई खलाशी (इंजिन साईड)</td><td>१६</td></tr>
</table>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | सहा.पोलीस उप निरीक्षक (मो.वा.जो.वर्ग-१) | ०१ | | |
| १० | पोलीस हवालदार (मो.वा.जो.वर्ग-२) | ०१ | | |
| ११ | पोलीस नाईक मोवाजो वर्ग-३ | ०१ | | |
| १२ | पोलीस शिपाई (मदतनीस) | ०३ | | |
| १ | पोलीस निरीक्षक (अभियांत्रिकी) | ०१ | **शासन निर्णय पीडब्ल्युएस-०५१९/प्र.क्र.३५१/पोल-४, दि.२८/०३/२०२२ अन्वये दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभागाकरिता २४ पदे** | महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्रमांक पोलीस ३६१८/प्र.क्र. १५/पोल- ३ दिनांक १५/०३/२०२४ अन्वये सर्व अस्थायी पदांना दिनांक ०१/०३/२०२४ ते ३१/०८/२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. |
| २ | पोलीस उपनिरीक्षक (अभियांत्रिकी) | ०२ | | |
| ३ | पोलीस उपनिरीक्षक (वाहतुक) | ०१ | | |
| ४ | सहा.पोलीस उपनिरीक्षक (रेडीओ यांत्रिकी ) | ०३ | | |
| ५ | सहा.पोलीस उपनिरीक्षक(प्रमुख बिनतारी यंत्राचालक) | ०४ | | |
| ६ | पोलीस हवालदार (बिनतारी यंत्रचालक) | ०७ | | |
| ७ | पोलीस हवालदार (विजतंत्री) | ०२ | | |
| ८ | पोलीस हवालदार (स्तंभ कारागिर) | ०१ | | |
| ९ | पोलीस नाईक (कर्मशाळा मदतनीस) | ०१ | | |
| १० | पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) | ०२ | | |
| **११** | **एकुण पदे** | **२१५६** | | |
| | **वजा स्थायी पदे** | **-११४** | | |
| | **एकूण अस्थायी पदे** | **२०४२** | | |

❖ **पोलीस अधीक्षक,पालघर कार्यक्षेत्रात कार्यरत उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालये,अंतर्गत पोलीस ठाणे व शाखा :**

| **अ.क्र** | **उपविभागीय अधिकारी कार्यालय** | **पोलीस ठाणे** | **बांधकाम वर्ष** | **दूरक्षेत्र** | **पोलीस कोठडी** |
|---|---|---|---|---|---|
| १ | उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय,पालघर | सातपाटी | २०११ | माहिम | ०२ |
| २ | | सफाळा | -- | | -- |
| ३ | | मनोर | -- | - | -- |
| ४ | | केळवा | २०१६ | - | ०१ |
| ५ | | पालघर | १९२३ | - | ०२ |
| ६ | उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय,बोईसर | बोईसर | १९७८ | - | ०१ |
| ७ | | वाणगांव | २०१५ | चिंचणी | -- |
| ८ | | तारापुर | २००५ | - | ०१ |
| ९ | उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय डहाणु | डहाणु | १९६८ | आशागड | ०३ |
| १० | | तलासरी | १९७१ | १.उधवा २.धुंदलवाडी | ०२ |
| ११ | | घोलवड | -- | - | -- |
| १२ | उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय,जव्हार | जव्हार | -- | १.खंबाळा<br>२.नेहाळे बुद्रुक | ०२ |
| १३ | | मोखाडा | १९२० | खोडाळा | -- |
| १४ | | कासा | १९६४ | १..सायवन<br>२.सोमटा | ०२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | | कासा | १९६४ | १..सायवन<br>२.सोमटा | ०२ |
| १५ | | विक्रमगड | १९५२ | तलवाडा | ०२ |
| १६ | | वाडा | १९६८ | १.कुडूस<br>२.ओगदापरेळी<br>३.खानेवली<br>४.गोऱ्हे | ०३ |
| | **०४** | **१६** | | **१५** | **२१** |

❖ **अंतर्गत शाखा :-**

| **अ.क्र.** | **नियंत्रण अधिकारी** | **शाखा** |
|---|---|---|
| | **पोलीस अधीक्षक** | |
| | **अपर पोलीस अधीक्षक** | |
| **१.** | **पोलीस उप अधीक्षक (गृह)** | पालघर सायबर पोलीस ठाणे |
| | | पोलीस मुख्यालय,पालघर |
| | | मोटार परिवहन विभाग,पालघर |
| | | पोलीस नियंत्रण कक्ष,पालघर |
| | | श्वान पथक,पालघर |
| | | सुरक्षा शाखा |
| | | जिल्हा विशेष शाखा |
| | | बिनतारी संदेश विभाग,पालघर |
| | | नागरी हक्क सुरक्षा शाखा |
| | | महिला सेल |
| | | वाचक शाखा |
| | | अंगूली मुद्रा शाखा |
| | | जिल्हा वाहतुक शाखा,पालघर |
| | | बॉम्ब शोधक व नाशक,पथक |
| | | अनैतिक मानवी वाहतुक शाखा |
| | | नक्षल विरोधी पथक,पालघर |
| | | सायबर सेल |
| | | महिला सहायक कक्ष |
| | | दहशत विरोधी पथक,पालघर |
| | | जनसंपर्क अधिकारी,पालघर |
| | | स्थानिक गून्हे शाखा |
| | | एल.ए.क्यू सेल |
| | | डायल-११२ |
| | | शोशल मिडीया लॅब |
| | | नोंदणी शाखा |
| | | पत्रव्यवहार शाखा |

| | | |
|---|---|---|
| | | लेखाशाखा |
| | | इमारत शाखा |
| | | विभागीय चौकशी शाखा |
| | | अर्ज शाखा |
| | | पेन्शन शाखा |
| | | रोखपाल |
| | | पोलीस कल्याण शाखा |
| | | लिपीक आस्थापना |
| २ | **उपविभागीय पोलीस अधिकारी** | आर्थिक गून्हे शाखा |

## ❖ पोलीस अधिकारी व अंमलदार वर्गाचे कर्तव्ये :-

- **पोलीस अधीक्षक :-**

पोलीस अधीक्षक हे कार्यालय प्रमुख आहेत. पालघर पोलीस बलाचे निर्देशन आणि देखरेख यासाठी पोलीस अधीक्षक जबाबदार असतात. सर्व मोठया समस्यांबाबत विशेषत: अधिकारी व अमंलदार वर्ग यांचे प्रशिक्षण व साधन सामग्री पुरवठा आणि भंडार वस्तु बलाचा निर्वाह खर्चासाठी आवश्यक असलेली आर्थिक तरतुद,वेगवेगळया श्रेणीतील अधिका-यांचे अधिकार व कर्तव्य यांचेशी संबधित सर्व साधारण धोरणाचा समस्यांबाबत निर्णय घेणे,कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि गुन्हा प्रतिबंधक व अन्वेषण या संबधित कार्यक्षमतेचा गरजेनुसार तपासणी करून संपर्क साधणे होते. पोलीस अधीक्षक,पालघर कार्यक्षेत्रातील पोलीस ठाणे तपासणी घेणे अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन करणे या सारखी कर्तव्ये पार पाडत असतात.

पालघर पोलीस घटकातील सर्व पोलीस ठाणे अंतर्गत कायदा आणि सुव्यवस्था,गुन्हयावर नियंत्रण,गुंन्हेगारी प्रतिबंध / अन्वेषण तपास करण्याचे काम पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी योग्य व कार्यक्षम रितीने करीत असल्याची खातर जमा करणे, अधिकारी व अंमलदार वर्गास शिस्त लागु करण्यासाठी तसेच त्यांची ग-हाणी मिटवण्यासाठी पोलीस ठाणेस अनपेक्षीत भेटी देऊन अधिकारी / अंमलदार दक्ष आहेत किंवा नाही हे पाहणे. पालघर पोलीस कार्यक्षेत्रातील सर्व पोलीस ठाणेंची वार्षिक तपासणी घेणे,दरम्यान अंमलदार यांचे सेवा अभिलेख पडताळणी करून शेरे नोंदविणे,पालघर पोलीस कार्यक्षेत्रातील पोलीस ठाणेतील गुन्हयाचा आढावा घेऊन गंभीर अपराध्याच्या ठिकाणी परिस्थितीनूसार भेट देणे हे पोलीस अधीक्षक यांची कर्तव्य आहेत.

- **अपर पोलीस अधीक्षक :-**

पालघर पोलीस घटकातील सर्व पोलीस ठाणे अंतर्गत कायदा आणि सुव्यवस्था,गुन्हयावर नियंत्रण,गुंन्हेगारी प्रतिबंध / अन्वेषण तपास करण्याचे काम पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी योग्य व कार्यक्षम रितीने करीत असल्याची खातर जमा करणे, अधिकारी व अंमलदार वर्गास शिस्त लागु करण्यासाठी तसेच त्यांची ग-हाणी मिटवण्यासाठी पोलीस ठाणेस अनपेक्षीत भेटी देऊन अधिकारी / अंमलदार दक्ष आहेत किंवा नाही हे पाहणे. पालघर पोलीस कार्यक्षेत्रातील सर्व पोलीस ठाणेंची वार्षिक तपासणी घेणे,दरम्यान अंमलदार यांचे सेवा अभिलेख पडताळणी करून शेरे नोंदविणे,पालघर पोलीस कार्यक्षेत्रातील पोलीस ठाणेतील गुन्हयाचा आढावा घेऊन गंभीर अपराध्याच्या ठिकाणी परिस्थितीनूसार भेट देणे सदर गुन्हयांबाबत आढावा घेऊन वरिष्ठांना कळविणे तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन व सुचना देणे  अपर पोलीस अधीक्षक यांची कर्तव्ये आहेत..

- **पोलीस उपअधीक्षक (गृह) :-**

पोलीस उपअधीक्षक (गृह) यांचे नियंत्रणाखाली पालघर पोलीस कार्यालयातील प्रशासनिक शाखा,मोटार परिवहन विभाग,बिनतारी संदेश विभाग आणि पोलीस मुख्यालय हे विभाग / शाखांचे कामकाज पाहणेसाठी सहायक अधिकारी म्हणून कामकाज पाहतात. त्यांच्या नियंत्रणाखालील विभांगावर सर्व साधारण देखरेख ठेवण्यास ते जबाबदार असतात. १० वर्षावरिल पोलीस अंमलदार यांचे वार्षिक शेरे लिहीणे,मुख्य पोलीस कार्यालयाच्या नियंत्रणाचे अधिन राहून कामकाज करतात. पोलीस मुख्यालय येथील देखरेखीकामी राखीव पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी कार्यरत असून पोलीस मुख्श्यालयातील कार्यकारी दलावर त्यांचे नियंत्रण असते.

या व्यतिरीक्त कार्यालयातील प्रशासनिक शाखा,आस्थापना शाखा,पत्रव्यवहार शाखा,लेखा शाखा इ.कामकाज त्यांचे नियंत्रणाखाली चालते. कार्यालयामध्ये पोलीस अधिकारी / कर्मचारी / वर्ग-३ लिपीक कर्मचारी यांची आस्थापना त्यांचे वेतन व भत्ते,रजा आदेश निर्गमित करणे,प्रशिक्षण पोलीस भरती प्रक्रिया,शिक्षा,बक्षीसे,सेवानिवृत्ती,वेतनवाढ,सेवा जेष्ठता,पदोन्नती,विभागीय चौकशीचे कामकाज इत्यादी कामे आहेत. पोलीस उपअधिक्षक (गृह) यांचे नियंत्रणाखाली राजकीय,शासकीय,निमशासकीय व सर्व पक्षाच्या हालचालींची माहिती सकलित करून घेणे, विविध बंदोबस्त योजना कार्यान्वीत करणे,पारपत्र शाखा,विदेशी नागरीक शाखेचे कामकाजावर नियंत्रण ठेवणे अशी महत्वाची कर्तव्ये पार पाडवी लागतात...

- **उपविभागीय पोलीस अधिकारी (SDPO) :-**

उपविभागीय पोलीस अधिकारी हे माहिती अधिकारी - जनमाहिती अधिकारी असतात. पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांचे कामकाजावर नियंत्रण ठेवणे व गुन्हे प्रतिबंध करणे,विशेष कार्यकारी अधिकारी या पदाचा कार्यभार असून प्रतिबंधक कार्यवाही खालील दाखल होणा-या गुन्हयाचे कामकाज व त्या व्यतिरीक्त नियंत्रणाखाली असलेल्या खालील पोलीस ठाण्याच्या सर्व कामकाजावर नियंत्रण ठेवणे, १० वर्षाच्या आतील पोलीस अंमलदार यांचे वार्षिक शेरे लिहीणे,पोलीस अधिकारी यांचे गोपनिय अवाल लिहीणे, प्रशासकीय कामकाज पाहणे,पोलीस ठाणे भेट,दोषारोपपत्राची पडताळणी करणे,पोलीस स्टेशन येथे दाखल होणा-या वार्षिक निरिक्षण घेणे,तडीपार प्रकरणाबाबत चौकशी करणे,तडीपार,अॅट्रोसिटी अॅक्ट संबधी गुन्हयाचे अहवाल वरिष्ठांना सादर करणे. तसेच वरिष्ठांकडून प्राप्त होणा-या अर्जांची चौकशी करणे...

- **पोलीस निरीक्षक / प्रभारी अधिकारी :-**

पोलीस निरीक्षक त्यांच्या प्रभारातील क्षेत्रातील गुन्हयाच्या प्रतिबंध आणि तापास तसेच त्यांच्या वरिष्ठांचे आदेश अंमलात आणणे. त्यांच्या हाताखालील कर्मचा-यांमध्ये योग्य प्रकारे शिस्त राखली जात आहे हे पाहण्यासाठी पोलीस निरीक्षक जबाबदार असतात. त्यांनी त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या कामांची सांगोपांग माहिती करून घ्याव व त्यांच्या हाता खालील सर्व पोलीस अंमलदार कर्तव्यावर हजर असून ,कर्तव्यदक्ष आहेत हे पहावे सार्वजनिक शांततेला बाधक ठरणारा कोणताही गुन्हा किंवा प्रसंग घडण्याची शक्यता पोलीस निरीक्षक / प्रभारी अधिकारी यांना माहिती होईल तेव्हा त्या शक्यतेची माहिती, त्यांना जी खबरदारीची उपाय योजना करणे त्यांना उचित वाटेल त्या उपाययोजनेसह त्यांच्या सर्व वरिष्ठ अधिका-यांना कळवतील. आवश्यकतेनूसार तेव्हा तेव्हा ते शेजारच्या पोलीस ठाण्याच्यचा पोलीस प्राधिकारीसोबत थेट पत्रव्यवहार करतील आणि आणि प्रभारातून निसटून जाणा-या अथवा निसटून जावून त्यांच्या प्रभारात येणा-या अपराध्यांना पकडण्यासाठी त्या प्राधिका-याबरोबर एक विचाराने कार्यवाही करतील. सर्वसाधारणपणे गुन्हयांना प्रतिबंध करण्यासाठी किंवा त्यांचा उपरोल्लिखित जबाबदा-यांमधुन मुक्त होणार नाही आणि दंडाधिका-यांकडून अनूज्ञेय मिळाल्याखेरीज पोलीसांना कार्यवाही करणे शक्य होणार नाही अशी प्रकरणे नसतील तर आदेशांसाठी न थांबता ते सर्व प्रकरणांमधील त्यांचे कार्य ताबडतोब सुरू करतील.

पोलीस अधीक्षक,अपर पोलीस अधीक्षक व पोलीस उपअधीक्षक (गृह) निर्देश देतील अशा रितीने पोलीस निरीक्षक त्यांच्या प्रभागातील पोलीसांची ठराविक काळाने तपासणी करतील. बलातील व्यक्तींनी केलेला कोणताही निष्काळजीपणा,गैरवर्तुणूक किंवा आदेशाची अवज्ञा,रजेशिवाय अनूपस्थिती किंवा त्यांना झालेला अपघात यांचे वृत्त पोलीस अधीक्षक यांना कळवितील आणि एकंदरीत त्यांच्या स्वत:च्या पोलीस ठाण्यामधील सुव्यवस्था रक्षणाच्या व्यवस्थेच्या क्षमतेशी संबधील सर्व बाबींची माहिती वरिष्ठांना सतत पूरवतील.

प्रभारी अधिकारी त्यांच्या प्रभारातील चौक्यांची महिन्यातुन निदान एकदा तपासणी करतील व अशा वेळी चौक्यामधील त्यांच्या शिपायांना त्यांच्या कर्तव्याबददल सुचना देतील. पोलीस ठाणेच्या कक्षेतील गावांना भेट देऊन पोलीस भेट नोंद पुस्तके व हजेरीपट तपासावेत. व नियम ७६ मध्ये नमुद अंतर्भूत असलेल्या तरतुदी दृष्टी समोर ठेवून गावातील गुन्हे संबधीताच्या नोंद वहया अद्यावत करून घ्याव्यात. त्यांच्या प्रभारात घडणा-या चालु घडामोडीची माहिती मिळण्यासाठी प्रत्येक संधी त्यांनी साधावी.

- **पोलीस हवालदार :-**

हवालदार हे त्यांचे वरिष्ठ म्हणून नेमलेल्या फौजदारांच्या आणि पोलीस बलातील वरिष्ठ अधिका-यांच्या आदेशांचे अधिन असतात. हवालदारांना नेमुण देण्यात येईल त्या प्रभाराच्या मर्यादेमध्ये त्यांना दूय्यम असना-या सर्व पोलीसांकडून आज्ञा पालन करून घेण्यास ते हक्कदार असतात. हवालदारांनी त्यांच्या प्रभारात घडणारे सर्व गुन्हे आणि दखलपात्र अपराध घडणार असल्या संबधीचे कोणतीही संभवनिहता त्यांच्या फौजदारांना कळविणे आवश्यक आहे. अपराध्याना शोधून त्यांना पकडण्यासाठी आवश्यक ती चौकशी सुरू करण्यासाठी त्यांना आदेश मिळण्यासाठी त्यांनी थांबून राहता कामा नये. गुन्हयास प्रतिबंध करताना व सूव्यवस्था राखतांना हवालदार त्यांचे वरिष्ठ अधिकारी त्यांना देखिल अशा आदेशाख्चे पालन करतील. अचानक किंवा संशयास्पद रितीने झालेल्या मृत्युच्या बाबतीत हवालदार किंवा हवालदान नसेल तर शिपाई त्याला फौजदाराकडून किंवा वरिष्ठ अधिकारीकडून आदेश मिळेपर्यंत प्रत जाळण्यास,पूरण्यास किंवा टाकुन देण्यास (पारशी पदधती )प्रतिबंध करतील.गावातील विशिष्ठ नाक्यांच्या किंवा गस्त क्षेत्राच्या प्रभार हवालदार कडे असेल त्यावेळी ते पोलीस व्यवस्थाविषयक सर्व बाबींमध्ये ग्राम पोलीस प्रमुखा प्रमाणे एक विचाराने कृती करतील. हाताखालील पोलीसांनी देखील कर्तव्यात केलेल्या हयगयीची आणि कोणत्याही आदेशाची अवज्ञा केल्याची किंवा त्याच्या इतर गैरवर्तनाची सर्व प्रकरणी वरिष्ठ अधिका-याच्या तात्काळ निदर्शनास आणून देण्यास हवालदारांना जबाबदार मानण्यात येईल. हवालदार हे फौजदारांचे सहायक असतात. त्यांनी फौजदारांना शिपाईची कवायत घेण्याचा शिकविण्याचा कामात व नाक्यावर वारंवार गस्त घालण्याच्या कामात सहाय्य करावे. शिपायांनी केलेली कोणतीही हयगय ताबडतोब पोलीस निरीक्षकांना कळविण्यात यावी. तसेच प्रशंसनिय कृतीही वरिष्ठांच्या निदर्शनास आणून दयाव्यात.

- **पोलीस शिपाई :-**

गुन्हयास प्रतिबंध व त्यांचा तपास करणे कायदा व सुव्यवस्था राखणे,फौजदार प्रक्रिया संहितेनुसार दंडाधिका-यांचे वॉरंट आवश्यक असल्यास त्याबाबतीत वॉरंटवर अपराध्यांना पकडून त्यांचे ताब्यात देण्यात येतील. असे कैदी निधी किंवा खाजगी व सरकारी मालमत्ता यांचे सोबत संरक्षण म्हणून जाणे व त्यावर पहरा करणे आणि मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या नियम २२ अन्वये पोलीस अधिका-यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार हवालदार व वरिष्ठ अधिकारी हे आदेश देतील अशा पोलीस व्यवस्थेविषयक कामे शिपाई पार पाडतील.ज्या गुन्हयासाठी पोलीस वॉरंट वाचुन अटक करू शकतात असा कोणताही गुन्हा घडल्यावर शिपायांने आदेशाची वाट न पाहता,सहका-यांचे माहितीसाठी ताबडतोब आणि व्यवहार्य असेल तेथे लेखी अहवाल द्यावा. आग लागल्याच्या किंवा इतर कोणत्याही संकटाच्या प्रसंगी सहाय करणे व जनतेच्या सुरक्षिततेसाठी आवाक्यात असेल ती खबरदारी घ्यावी. नित्याचे गस्तीचे कर्तव्य शिपाई पार पाडणार नाही गावामध्ये फेर फटका मारून काय माहिती मिळते काय हे पाहण्यासाठी शिपायांचा उपयोग करावयाचा नसतो. गस्त वाल्याच्या क्षेत्रात येणा-या कोणत्याही कर्तव्यासाठी शिपायांचा वापर करावयाचा असेल तेव्हा त्याला नेमक्या सूचना देण्यात आल्या पाहिजे.

- **पोलीस निरीक्षक परिवहन शाखा :-**

मोटार परिवहन अधिकारी हे त्यांचे जेथे नियुक्ती आहे तेथील विभागाचे थेट प्रभारी अधिकारी राहतील. प्रशासकीय बाबतीत पोलीस अधीक्षक यांचे नियंत्रणाखाली असतील आणि तांत्रिक बाबतीत पोलीस उप महानिरीक्षक मोटार परिवहन विभाग,पुणे याच्या नियंत्रणाखाली असतील. प्रभारी अधिकारी मोटार परिवहन विभागांतर्गत नौका विभाग देखिल कार्यरत आहे. त्या अनूषंगाने सागरी गस्त कामी नौका दुरूस्ती देखभाल तसेच नौका विभागातील कार्यरत कर्मचारी यांना डयूटी वाटपाचे कामजावर लक्ष देणे ही सर्व जबाबदारी पोलीस निरीक्षक परिवहन शाखेची आहे. प्रभारातील सर्व वाहनांचा अधुनमधून पुर्ण तपासणी करीता आणि शक्ता नेहमीच वाहने सुव्यवस्थित ठेवण्याकरीता जबाबदार राहतील. प्रभारामधील वाहन दूरूस्ती आणि परिक्षण,भंडाराचा व्यवहार (पॅट्रोल,ऑईल,वंगण व सुटटे भाग इ.) मोटार परिवहनचे विविध अभिलेख ठेवणे,प्रशासकीय अभिलेख असे सर्व शाखांवर ते नियंत्रण ठेवून देखरेख करतील.प्रभारीतील मोटार परिवहन विभागाचे तपासणी वरिष्ठांनी करण्यासाठी जरूर ती व्यवस्था ते करतील.सर्व भंडार खतावणी आणि इतर मोटार परिवहन अभिलेख अद्यायावत ठेवतील तसेच आवश्यक ती कार्यवाही करतील. सूचना व तपासणी टिपणीची पुर्तता करतील. त्यांच्या कनिष्ठ कर्तचा-यांना योग्य प्रकारे कर्तव्य वाटप केले जातील याबाबत ते खात्री करतील आणि त्यांची कार्यक्षमता व शिस्त राखतील.

- **राखीव पोलीस निरीक्षक :-**

राखीव पोलीस निरीक्षक हे पोलीस मुख्यालयाचे प्रभारी अधिकारी म्हणून कार्यभार पाहतात. पोलीस मुख्यालयात आवश्यक असलेल्या साधन सामुग्रीची मागणी देखभाल यावर राखीव पोलीस निरीक्षक यांचे नियंत्रण असते. उजळणी कार्यक्रम,परेड सराव असे उपक्रम राखीव पोलीस निरीक्षकांमार्फत केले जातात. भाडार गृहात येणा-या सामुग्री तसेच त्या सामुग्रीचे योग्य वाटप झाले अगर कसे याची तपासणी योग्यत्या कालवधीत घेणे आवश्यक आहे. पालघर पोलीस कार्यक्षेत्रात आवश्यक त्या ठिकाणी योग्य बंदोबस्त पुरविण्याची सर्वस्वी जबाबदारी ही राखीव पोलीस निरीक्षक यांची असते. तसेच मुख्यालयात असलेल्या जलद प्रतिसाद,आरमर विभाग,शस्त्रागार, पथक,दंगल नियंत्रण पथक तसेच बँण्ड पथक यांची सर्व जबाबदारी राखीव पोलीस निरीक्षक यांची आहे. मुख्यालयातील सर्व अंमलदार / निलंबित अंमलदार यांची हजेरी ,पगार देयक माहिती वेळेवर सादर करणे तसेच त्यांचे कामकाजाचे नियोजन डयूटी वाटप योग्य पदधतीने होत आहे अगर कसे याबाबत वारंवार तपासणी घेणे आवश्यक आहे. गैरहजर,बेशिस्त तसेच सिक रजेबाबत अहवाल राखीव पोलीस निरीक्षक यांनी पडताळणी करून पाठविणे आवश्यक आहे.

- **कार्यालय अधीक्षक :-**

कार्यालय अधीक्षक हे प्रशाकीय अधिकारी आहरण तथा संवितरण अधिकारी म्हणून कारभार संभाळत असतात. प्रशासकीय कामकाजातील मंत्रालयीन कर्मचारी यांचेवर कार्यालय अधीक्षक यांचे नियंत्रण असते. कार्यालयात होणा-या आर्थिक कामकाज तसेच कार्यालयीन कामकाजाला कार्यालय अधीक्षक जबाबदार असतात. कार्यालय अधीक्षक यांचे अधिपत्याखाली प्रमुख लिपीक,वरिष्ठ श्रेणी लिपीक,कनिष्ठ श्रेणी लिपीक,कार्यालयीन शिपाई कामकाज करीत असतात. तसेच त्यांचे नियंत्रणात पत्रव्यवहार शाखा,लेखाशाखा,आस्थापना शाखा,आस्थापना शाखा-२,विभागीय चौकशी,रोखपाल,इमारत शाखा असतात. कामकाजाचे सुनियोजन करणे, कर्मचारा-यांना मार्गदर्शन करणे,कार्यालयात शिस्त ठेवणे,आलेल्या प्रकरणांची योग्य वेळेत निर्गती होत आहे अगर कसे यावर लक्ष ठेवणे, साप्ताहीक घोषवारा तपासणे, शेरे नोदविणे,तीन महिन्यातून एकदा लिपीकांची वैयक्तिकरित्या कामाची तपासणी घेणे,माहितीचा अधिकार अंतर्गत प्राप्त अर्जाच्या निर्गतीवर लक्ष ठेवणे व त्यासाठी ठेवलेली नोंदवही दर सोमवारी तपासणे,वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात येणा-या नियतकालीकांची यादी तयार करून वेळेवर पूर्तता करणे संबधी शाखांकडे पाठपूरावा करणे व चौकशी करीता येणा-या अभ्यागतांकडे लक्ष देऊन समाधान करणे तसेच वरिष्ठांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करून घेणे अशी कर्तव्ये असतात.

- **प्रमुख लिपीक :-**

प्रमुख लिपीक हे शाखेतील कार्यरत मंत्रालयीन कर्मचारी व कार्यालय अधीक्षक यांचे मधील दुवा असतात. शाखेत येणारे दैनंदीन टपाल तपासून संबधीतांना त्याबाबत करावयाची कार्यवाहीबाबत मार्गदर्शन करणे, साप्ताहीक गोषवारा तपासणे,पोलीस अधिकारी प्रशिक्षण व कोर्सेस इ.बाबतची कामे हाताळणे, कामात दिरंगाई कर्मचारी यांचे कसूरी अहवाल सादर करणे,नोंदणी शाखेतील अ व ब नोंदवही,रोखपाल यांची रोजकिर्द,माहिती अधिकार नोदवही,अतारांकीत प्रश्न नोंदवही,अर्धशासकीय नोंदवही,स्टेशनरी नोंदवही प्रमाणे साहित्य,भांडार पडताळणी करणे,अंदाजपत्रक तयार करणे, पोलीस कल्याण शाखेचे लेखापरिक्षण करणे,विभागीय चौकशी प्रकरणे, सेवानिवृत्ती विषयक प्रकरणे हाताळणे,पोलीस भरती प्रकरणे ,प्राप्त अग्रीमा संबधीची सर्व कामे असे महत्वाची कामे प्रमुख लिपीक यांची आहेत.

❖ **.पोलीस अधीक्षक ,पालघर अधिनस्त शाखा / कार्यालये :-**

पोलीस अधीक्षक कार्यालयात प्रशासकीय व कायदा व सुव्यवस्था अशा दोन प्रकारात कामकाज केले जाते. सदर बाबत थोडक्यात माहिती :-

❖ **पत्रव्यवहार शाखा :-**

पोलीस अधीक्षक कार्यालयात प्रशाकीय कामकाज हे पोलीस उप-अधीक्षक (गृह) यांच्या नियंत्रणाखाली पार पाडले जाते. परंतु अंतिम निर्णय हे पोलस अधीक्षक पालघर घेतात. प्रशासकीय कामकाज मंत्रालयीन कर्मचारी यांचे मार्फतीने केले जाते. पोलीस अधीक्षक पालघर प्रशासकीय शाखा खालील प्रमाणे आहेत. वरिष्ठ कार्यालयाकडून होणारा पत्र व्यवहार संबधी कामकाज तसेच वरिष्ठ कार्यालयाकडून मागविण्यात आलेली माहिती याबाबत कामकाज पाहिले जाते. तसेच मोटार परीवहन शाखा यांचेकडील प्राप्त इंधन संबधी बिले,माहितीचा अधिकार, तसेच भाडयाने असलेले पोलीस ठाणे यांची भाडया संबधी बिले,पाणी कर,विदयुत देयके,कैदी आहार भत्ता, याबाबत सविस्तर कार्यवाही करण्यात येते.

- **इमारत शाखा :-**

पोलीस अधीक्षक पालघर कार्यक्षेत्रात पोलीस ठाणे यांची दूरूस्ती तसेच नवीन बांधकाम, पोलीस कम्रचारी यांचे निवास्थान दुरूस्ती तसेच नवीन बांधकाम करणे, पोलीस ठाणे करीता जागा हस्तांतरण करणे ,पद,नवीन पोलीस ठाणे मंजुरी करीता प्रस्ताव सादर करणे या सारखी कामे इमारत शाखेकडून केली जातात.

- **अधिकारी आस्थापना :-**

पोलीस अधीक्षक पालघर आस्थापनेवर कार्यरत पोलीस अधिकारी,यांच सेवापट अद्यावत करून जतन करणे,रजा,पदोन्नती,वेतन निश्चिती,बदल्या या सारखी कामकाज या शाखेकडून केले जाते.

- **प्रबंधक शाखा :-**

पोलीस अधीक्षक कार्यालयात दैनंदीन कामकाजाकरीता लागणारी स्टेशनरी,वस्तू, जिल्हा पोलीस दल बळकटीकरणांतर्गत लागणारे साहित्य, प्रबंधक शाखे मार्फतीने खरेदी करण्यात येतात.

- **पोलीस कल्याण शाखा :-**

पोलीस अधीक्षक पालघर आस्थापनेवर कार्यरत पोलीस कर्मचारी यांना वैदयकीय अग्रीम,सानुग्रह अनुदान व अंत्यविधी अनुदान,चष्मा अनूदान,महिलांकरीता सुदृढ बालिका अनुदान व विशेष पोषण आहार अनुदान,शैक्षणिक अनुदान,स्वग्राम रजा सवलत,महाराष्ट्र दर्शन रजा सवलत या सारखी अनुदानाबाबत कामे केली जातात.

❖ **आस्थापना शाखा :-**

पोलीस अधीक्षक,पालघर आस्थापनेवरील पोलीस कर्मचारी यांचे सेवापटात नोंदी अद्यावत ठेवणे,त्यांच्या रजेबाबत,वेतन निश्चिती संबधी ,पदोन्नती,बदल्या या सारखी कामे आस्थापना शाखेत केली जातात.

❖ **लेखाशाखा :-**

पोलीस अधीक्षक ,पालघर आस्थापनेवरील पोलीस अमंलदार / कर्मचारी,मंत्रालयीन कर्मचारी, यांचे वेतन संबधी देयके, वेतन फरकासंबधी देयके,प्रवास भत्ता,घर बाधणी अग्रीम, इ.देयके तयार केली जातात. सदरची देयके तयार करून कोषागार,पालघर येथे सादर केली जातात.

❖ **विभागीय चौकशी शाखा :-**

पोलीस दल हे शिस्तप्रिय असल्याने पोलीस अधीक्षक ,पालघर आस्थापनेवरील पोलीस अमंलदार / कर्मचारी यांच्या गंभार स्वरूपाच्या कसुरी संबधी चौकशी करुन त्यांना योग्यते शासन दिले जाते.

❖ **पेन्शन शाखा :-**

पोलीस अधीक्षक पालघर आस्थापनेवरील नियत वयोमानानूसार सेवानिवृत्त होणारे पोलीस अमंलदार व अधिकारी यांचे रजेसंबधीचा पगार,गटविमा,पेन्शन मंजूरी या सारखी प्रकरणे विहीत वेळेत सादर करून मंजुर केली जातात.

## ❖ कायदा व सुव्यवस्था :-

### ● जिल्हा विशेष शाखा :-

पालघर जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न जातीय घटना,संप निदर्शने,मोर्चे याबाबत गोपनिय माहिती संकलीत करून कार्यवाहीस्तव पोलीस ठाण्यास मार्गदर्शन करणे.. कायदा व सुवव्यवस्था मा.मंत्री दौरे, राजकीय व सामाजिक कार्यक्रम,सणत्सोव अनुषंघाने पोलीस बंदोबस्त नेमणे. जातीय घटनाची माहिती ठेवणे. सदरचा अहवाल मा.पोलीस अधीक्षक यांना सादर करणे. परकिय नागरीक / स्थानिक नागरीक पारपत्र ,नाहरकत दाखला तसेच चारीत्र पडताळणी करणे. संरक्षण पुरविणे अशी कामे केली जातात.

### ● स्थानिक गुन्हे शाखा :-

स्थानिक गून्हे शाखेत जिल्हयातील घडलेल्या गंभीर व मालमत्तेबाबत गुन्हे यांची माहिती संकलीत करणे अशा गुन्हयात शामिल गुन्हेगारांची माहिती अद्यावत ठेवणे. जिल्हयातील गंभीर गुन्हे उघडकीस आणण. जिल्हयात घडलेले मालमत्तेचे गुन्हयांमध्ये संभाव्य आरोपींची यादी (सजेशन) तपासी अमलदार यांना देणे. अवैदय धंदे यावर आळा घालणे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हे विशेष कार्यकारी दंडाधिकारी असून यांच्याकडे जिल्हयातील सराईत गून्हेगारावर प्रतिबंधक कारवाईचे प्रस्ताव चालतात. तसेच जिल्हयातील गुन्हेगारांना मोक्का,एम.पी.डी.ए. महाराष्ट्र पोलीस अधिनियम क.५६,५७ चे प्रतिबंधक कार्यवाही करीता स्क्रूटीने करून मा.पोलीस अधीक्षक यांचे मार्फत संबधीत प्राधीकारी यांना सादर करणे.

### ● सुरक्षा शाखा :-

सुरक्षा शाखेमध्ये सागरी सुरक्षा संदर्भातील जेट्टी, बंदरे, लॅन्डींग पॉईट, कोस्टल चेकपोस्ट, मच्छीमार सोसायटी, बोटी, मर्मस्थळे, पर्यटन, कांदळवन, मरीन प्रशिक्षण ( मरीन प्रशिक्षण, ओखा गुजरात प्रशिक्षण, पुणे मुलभूत प्रशिक्षण, बोटींवरील तांत्रिक मनुष्यबळ प्रशिक्षण व इतर कोस्टलचे प्रशिक्षण ), सागर रक्षक दल, तटरक्षक दल, वॉच टॉवर, ऑपरेशनल रूम, फिशरीज लॅन्डींग पॉईट, सागर कवच अभियान, सी व्हिजील अभियान, सजग अभियान, मिनी सागर कवच अभियान, बायोमॅट्रीक कार्ड, बायोमॅट्रीक कार्ड रिडर मशीन, नैसर्गिक आपत्ती संदर्भातील येणाऱ्या एसओपी या संदर्भात सर्व कामकाज वरिष्ठ कार्यालयात सादर करण्यात येत असते.

### ● बॉम्ब शोधक व नाशक पथक :-

बॉम्ब शोधक व नाशक पथकामध्ये विशेष प्रशिक्षीत पोलीस अमंलदार व अत्यानुधिक साधन सामुग्री तसेच प्रशिक्षीत श्वान आहे सदर पथक. जिल्हयात स्फोटक आढळुन आल्यास त्याची तपासणी करून विल्हेवाट लावण्याची कार्यवाही करत असते. मा.मंत्री यांच्या सभेपुर्वी बॉम्ब नाशक पथकामार्फतीने सभेच्या ठिकाणांची तपासणी करण्यात येते.

### ● सी.सी.टी.एन.एस. :-

सी.सी.टी.एन.एस. या शाखेमध्ये सर्व पोलीस स्टेशन येथे सॉफ्टवेअर बाबत काही अडचणी आल्यास गुन्हे अन्वेषण विभाग पुणे, यांच्यामार्फत अडचणींचे निराकरण केले जाते. मा. अपर पोलीस अधीक्षक यांच्या आदेशान्वये सर्व पोलीस ठाणे येथे आय.आय.एफ. १ ते १८ फॉर्म भरले अगरे कसे याची पडताळणी करून त्यांच्यावर कार्यवाही केली जाते. तसेच आयसीजीएस पोर्टलचा वापर करून परकीय नागरीक,पासपोर्ट पडताळणी , शस्त्र परवाना अर्जदार यांचे पुर्व इतिहास तपासणी करणे. आयटीएसएसओ पोर्टल मधील महिला व बालकांसंदर्भातील गुन्हे २ महिन्यांचे आत निर्गती करणेबाबत वरिष्ठांच्या

आदेशान्वये  सर्व पोलीस ठाणे यांना पत्रांद्वारे कळविणे.

- **भरोसा सेल :-**

भरोसा सेलच्या माध्यमातून पिडीत महिला, मुले व ज्येष्ठ नागरीक यांना एकाच ठिकाणी सर्व प्रकारची मदत व सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात, एकाच छताखाली सेवांची उपलब्धता करून पिडीत महिला, बालक व ज्येष्ठ नागरीक यांना मानसिक आधार देवुन योग्य मार्गदर्शन करून त्यांचे पुनवर्सन भरोसा सेलच्या माध्यमातून करण्यात येते. पालघर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यात ज्येष्ठ नागरिक, विशेष पोलीस बाल पथक, पोलीस काका/पोलीस दिदी, जागरुक नागरीक, बडी कॉप हे युनिट स्थापन करण्यात आले असून सार्वजनिक व निर्जन स्थळी, शाळा/कॉलेज, मॉल मल्टीप्लेक्स, सरकारी कार्यालये, हॉस्पिटल, हौसिंग सोसायटी इ. ठिकाणी  पेट्रोलिंग करून नागरिकांना व महिलांना वेळोवेळी सूचना देवून मार्गदर्शन केले जाते. तसेच त्या संदर्भातील माहिती इकडील कार्यालयात संकलित करुन वरिष्ठांना सादर केली जाते. प्राप्त तक्रारींचे निरसन केले जाते. तसेच गुन्हेगारी वातावरणापासून बालकांना दूर ठेवण्याकरीता वेगवेगळया योजना राबवितात. दरमहा मासिक / सहामाही सांख्यिकी अहवाल मा. पोलीस महासंचालक व अपर पोलीस महासंचालक यांना पाठविण्यात येते.

❖ **अंगुली मूद्रा शाखा :-**

अंगुलीमुद्रा शास्त्र हे व्यक्तीचे ओळख पटविण्याचे शास्त्र आहे. त्याव्दारे कोणत्याही जिवंत व्यक्तीची ओळख पटविता येते. अंगुलीमुद्रा विभागाचा उपयोग महाराष्ट्र पोलीस दलामध्ये गुन्हेगारांची ओळख पटवून त्यांच्यावर असणाऱ्या पूर्व शिक्षेचा तपशील तसेच त्या गुन्हेगारांची गुन्हास्थळी असणारी उपस्थिती, गुन्हे तपासकामी न्यायालयात पुरावा म्हणून सादर केली जाते.

महाराष्ट्र राज्यात गुन्हे अन्वेषण विभागाच्या अधिपत्याखाली अंगुलीमुद्रा केंद्राची स्थापना सन १८९९ साली पुणे येथे झाली. अंगुलीमुद्राविभागाचे पुणे येथे मुख्य कार्यालय असून मुंबई, नागपूर व छत्रपती संभाजीनगर येथे तीन विभागीय कार्यालये तसेच ४५ पोलीस घटकांमध्ये जिल्हा व आयुक्तालय अंगुलीमुद्रा कार्यालये असून तेथे नियुक्त अंगुलीमुद्रा तज्ज्ञ हे गुन्हास्थळी भेट देण्याचे कामकाज पाहतात.

- **बोटांचे ठशांचे उपयोग :-**

बोटांच्या ठशांच्या साहाय्याने कोणत्याही जिवंत अथवा मृत व्यक्तीची ओळख पटविता येते. पोलीस, बँक, वित्तीय संस्था, न्यायालय, पारपत्र कार्यालय, निवडणूक आयोग, इस्पितळे इ. ठिकाणी बोटांच्या ठश्यांच्या साहाय्याने व्यक्तीगत ओळख पटविता येते.

- **अंगुलीमुद्रा विभागाचे कामकाज :-**

१. पोलीस ठाणेस दैनंदिन अटक होणाऱ्या आरोपींच्या अंगुलीमुद्रा पत्रिकांची अटक व शिक्षाप्राप्त अभिलेखावर तपासणी करून त्यांचा पूर्व इतिहास पोलीस ठाणेस कळविला जातो. जेणेकरून सदर आरोपीस वाढीव शिक्षेसाठी व पोलीस कोठडी मिळवणेकरिता पोलीस दलास मदत करणे.
२. शिक्षाप्राप्त व अटक आरोपींच्या अंगुलीमुद्रा पत्रिकांचा अभिलेख संग्रहित करणे.
३. गुन्ह्यांच्या घटनास्थळी अज्ञात व्यक्तीने हाताळलेल्या संशयित वस्तुंची शास्त्रोक्त पद्धतीने तपासणी करून ठसे विकसित करणे. सदर ठश्यांचे अभिलेखावरील आरोपींच्या अंगुलीमुद्रा पत्रिकांशी तपासणी करून आरोपी निष्पन्न करून देणे व सदर आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा मिळणेकामी पुरावा उपलब्ध करून देणे.
४. अंगुलीमुद्रा केंद्रात पोलीस ठाणे, न्यायालये, बँका, शासकीय निमशासकीय कार्यालये, सैन्यदले व खाजगी इसम यांचेकडून

वादग्रस्त दस्तऐवज प्राप्त असतात. सदर वादग्रस्त दस्तऐवजावरील ठशांचे तुलनात्मक परीक्षण करून मतप्रदर्शन करणे व आवश्यकतेनुसार कोर्ट साक्ष देण्याचे काम करणे.
५. अनोळखी मयत इसमांच्या अंगुलीमुद्रा पत्रिकांची अभिलेखावर तपासणी करून ओळख पटविणे.
६. फरार व तडीपार आरोपींच्या नोंदी अभिलेखावर ठेवणे.
७. परदेशगमन करणाऱ्या नागरिकांची संबंधित देशाच्या PCC करिता अंगुलीमुद्रा पत्रिका शासकीय मूल्य आकारून तयार करून देणे

- **नक्षल विरोधी पथक :-**

मासिक /पंधवडा अहवाल सादर करणे, संघटनांवर बारीक लक्ष ठेवणे, पालघर जिल्हा हा बहुमोल आदीवासी जिल्हा असल्याने सदरच कार्यकर्ते आक्रमक असल्याने त्याबाबतची गोपनिय माहिती काढून वेळीच कारवाई करणे. तसा अहवाल वरिष्ठ कार्यालयात सादर करणे.

- **नागरी हक्क संरक्षण शाखा :-**

पोलीस अधीक्षक पालघर कार्यक्षेत्रात ॲक्रोसिटी ॲक्ट संबधित गुन्हे घडत असतात. सदर गुन्हयांची माहिती संकलित करून ती वरिष्ठ कार्यालयात सादर करणे व संबधीतांना आर्थिक मदत मिळवुन देण्यास प्रयत्न करणे.

- **वाचक शाखा :-**

पोलीस अधीक्षक कार्यालयातील वाचक शाखेत दैनिक गून्हे अहवालावरी चेक करणे,वरिष्ठ व कनिष्ठ कार्यालयाशी पत्रव्यवहार करणे,दोषारोप पत्रास मंजुरी देण,स्थानिक अर्जाची चौकशी करणे,गुन्हे सांखिकी माहिती तयार करून वरिष्ठ कार्यालयात सादर करणे.

- **अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा :-**

भादविस कलम ३६३ मधील अपहरीत मुले/मुली यांचा ४ महिन्यांत तपास न लागल्यास सदर गुन्ह्यांचा तपास इकडील कार्यालयात केला जातो. अवैद्य मानवी वाहतूक तस्करी होते अगर कसे याबाबत गोपनीय माहिती संकलित केली जाते. अवैधरित्या चालणारे वेश्या व्यवसायांवर कार्यवाही करून पिडींतांचे पुनवर्सन केले जाते. बालकामगार, बालमजुरी करणाऱ्यांवर कार्यवाही करणे. बेवारस मिळुन आलेल्या मुले/मुली यांना ताब्यात घेऊन बालकल्याण समिती मार्फत पुनवर्सन केले जाते. रेस्क्यु ऑपरेशन आयोजित करणे अशा प्रकारच्या कामकाजाची माहिती संकलित करून वरिष्ठ कार्यालयात सादर केली जाते.

- **दोष सिदधी सेल :-**

न्यायालयातील कोर्ट पैरवी यांचेकडून चालणा-या केसची माहिती घेऊन त्यांना मार्गदर्शन करणे व लक्ष ठेवणे. पोलीस अभियोक्ता यांची माहिती,मध्यवर्ती संनियंत्रण समिती,न्यायालयातुन सुटलेल्या गून्हयांपैकी एका गुन्हयाचे निकाल सी.आय.डी. यांना पाठविणे, गुन्हयांची हेड वाईज माहिती तयार करणे.शाबित सुटलेल्या आरोपीची माहिती तयार करणे. अशी कामे केली जातात.

- **सायबर सेल :-**

सायबर सेल पालघर येथे जिल्यातील तपासीक अंमलदार यांना मागणी पत्राप्रमाणे सीडीआर/एसडीआर तसेच सांक्षाकीत प्रती मिळणविणे करीता फेसबुक,गुगल,इंस्टाग्राम सर्व बॅंक मॅनेजर इ.नोडल ऑफिसर यांना पत्रव्यवहार करुन तपासकामी उपयुक्त तांत्रिक माहिती प्राप्त करण्यात येते.तसेच पोलीस ठाणे येथ माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० अन्वये दाखल गुन्हयांचे तांत्रिक मदत करण्यात येते.नेशनल सायबर पोर्टलवर ऑन लाइन तक्रारींचा पाठपुरावा करण्यात येतो.पालघर पोलीस दल वेबसाईटवर जिल्हयातील गंभिर गुन्हे,बाबत माहिती प्रकाशित करण्यात येते.

- **. बिनतारी संदेश विभाग :-**

बिनतारी संदेश यंत्रणेची दुरूस्ती व देखभाल करणे,बिनतारी संदेशांची देवाणघेवाण करणे,डी.एफ.एम.डी व एन.एच.एम.डी ची उभारणी करणे.डायल -११२ करीता सहकार्य करणे,महत्वाचे बंदोबस्तकामी रिपोर्टरच उभारणी करणे.अतिरीक्त स्थानांची उभारणी करणे.वाहनांवरील पी.ए. सिस्टीम बसविणे,सव्र पोलीस ठाणे यांचेकडील वायरलेस संचाची तपाणी करून त्याचा मेंनटेन्स करणे अशी कामे केली जातात.

- **पोलीस नियंत्रण कक्ष :-**

महत्वाचे फोन , सर्व जिल्हयाचा डेली रिपोर्ट तयार करणे,जिल्हयातील महत्वाचे गुन्हे हे पोलीस महासंचालक यांचे कार्यालयात सादर करणे, महत्वाचे टपाल,वायरलेस वितरीत करणे,थर्ड आय च्या माध्यमातुन गस्तीवर असलेल्या सर्व वाहनांवर लक्ष ठेवणे. डायल ११२ या अतितात्काळ सेवाला वारंवार मदत करणे.

- **आर्थिक गून्हे शाखा :-**

वरिष्ठांच्या आदेशानुसार तपासकामी देण्यांत आलेल्या आर्थिक फसवणूकीबाबत क्लीष्ट गुन्हयांची उकल करणे. आरोपींविरुध्द सबळ पुरावा प्राप्त करुन त्यांच्याविरुध्द कारवाई करुन मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करणे.तसेच आर्थिक फसवणूकीच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या तक्रारी अर्जाची दखल घेऊन संबंधीत गैरअर्जदार / कसुरदार यांच्याविरुध्द कायदेशीर कारवाई करुन संबंधीत अर्जदार यांना ज्ञान मिळवून देणे.

- **तारांकीत प्रश्न शाखा :-**

एल.ए.क्यु सेल शाखेमध्ये वरीष्ठ कार्यालयातू आलेल्या प्रश्नांची माहिती मा.पोलीस महासंचालक महाराष्ट्रा राज्य मुंबई. पोलीस उपमहानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई. तसेच अपर मुख्य सचिव, गृह विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई तसेच अपर पोलीस महासंचालक गुन्हे अन्वेशन विभाग पुणे येथुन विचारणा केलेल्या प्रश्न तारांकीत, अतारांकीत, कपात सुचना,आश्वासन,ठराव,सांख्यिकी माहिती. इत्यादी विचारणा केलेल्या प्रश्नांची माहिती पालघर जिल्हयांशी संबधीत असल्याने ती माहिती तात्काळ पुरविण्यात येते.

- **मिडीया लॅब**.:-

ही शाखा सोशल मिडीयाशी संबंधित फेसबुक, ट्विटर इत्यादीवरील आक्षेपार्ह पोस्ट तसेच कमेंट्सवर देखरेख ठेवतात. ज्या पोस्टमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशा पोस्ट ब्लॉक करतात

- **महिला सेल :-**

महिला सेल शाखेत महिला अत्याचार, बाल अत्याचार, मिसिंग अपहरण व आयोग व वरीष्ठ कार्यालय यांचेकडुन पाठविण्यात येणारे अर्ज बाबत कामकाज चालते. मा.पोलीस महासंचालक महाराष्ट्रा राज्य मुंबई. पोलीस उपमहानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई. तसेच अपर मुख्य सचिव, गृह विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई तसेच अपर पोलीस महासंचालक गुन्हे अन्वेशन विभाग पुणे येथुन विचारणा केलेल्या प्रश्न तारांकीत, अतारांकीत, कपात सुचना,सांख्यिकी माहिती. इत्यादी विचारणा केलेल्या प्रश्नांची माहिती पालघर जिल्हयांशी संबधीत असल्याने वेळेचे वेळेवर पुरविणे. महिला अत्याचार, बाल अत्याचार, मिसिंग अपहरणाबाबत माहिती संकलीत करुन अद्यावत ठेवणे. तसेच सदरबाबतची रजिस्टर लिहणे व अदयावत करणे.

- **दहशतवाद विरोधी कक्ष :-**

मुस्लिम मिसींग,हिंदुत्ववादी संघटना संबधी आरोपींच्या हालचालीवर लक्ष देणे,मोबाइल सिम कार्ड,भाडेकरू तपासणी,वाहन तपासणी,सायबर कॅफे,सागरी सुरक्षा याबाबतचा मासिक अहवाल वरीष्ठ कार्यालयात सादर करणे.

❖ **पालघर पोलीस मुख्यालय अधिनस्थ शाखा :-**

पालघर पोलीस आस्थापनेवरील पोलीस मुख्यालय हे महत्वाची भुमिका पार पडते. मुख्यालयावर मुख्य:त पोलीस अधीक्षक (गृह) यांचे नियंत्रण असते. आवश्यकतेनुसार पोलीस दल पाठवणे ही जबाबदारी राखीव पोलीस निरीक्षक यांची असते.

- **शिघ्र कृती दल ( क्यू.आर.टी ) :-**

जिल्हा मध्ये कुठे आंतकवादी कार्यवाही झाल्यास तात्काळ शिघ्र कृती दल चे जवान त्या घटनास्थळी रवाना होतात.

- **दंगल नियंत्रण पथक ( आर.सी.पी ):-**

जिल्हा मध्ये कुठे बेकायदेशीर जमाव झाल्याने त्या जमावाला पागविणे.किंवा मोर्चा किंवा राजकिय सभा या सारख्या अनेक कारणास्तव मुख्यालयातुन दंगल नियंत्रण पथक रवाना केले जाते.

- **आरमोरर शाखा :-**

जिल्हा मध्ये प्रत्येक ठिकाणी गार्ड डयुटी करीता पोलीस अंमलदारच्या जवळ वेगवेळया रायफल असतात.त्या रायफलीना वेळोवेळी साफसफाई करीता नेले जाते. जिल्हा मध्ये असलेल्या सर्व शस्त्रांची तपासणी करून दुरूस्ती करणे अशा प्रकारची कामे केली जातात.

- **शस्त्रागार :-**

सर्व पोलीस मुख्यालयातील दारु गोळा व राऊड.पिस्तटल या सारख्या अनेक शस्त्रार या ठिकाणी असतात.तसेच व्ही आय पी याचे दौरे असतील तर येथुन शस्त्रार पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार घेऊन जातात. जिल्हा पोलीस दलाचा शस्त्र साठा येथे ठेवण्यात येतो.

- **भांडारगृह :-**

पोलीस कर्मचारी यांना लागरणारे साहीत्य आवश्यकते नुसार वाटप करणे.व पोलीस भरतीला लागणारे सर्व साहित्य या ठिकाणी असते.

- **बँन्ड पथक :-**

पालघर पोलीस दलातील पोलीसांना दर मंगळवार व शुक्रवारी परेड नियोजित केलेली आहे. त्या अनुषंघाने बँन्ड पथक आवश्यक आहे. वरिष्ठ अधिकारी कार्यालयास भेट देतात तेव्हा सलामी करीता बँन्ड पथक आवश्यक आहे. २६ जानेवारी, १५ ऑगस्ट , १ मे या सारखे कार्यक्रमाला पोलीस बँन्ड कमी येतो. पोलीस दलातील पोलीस कर्मचारी यांना लग्न संमारंभ अशा कारणास्तव स्वत दरात बँन्ड पुरविला जातो.

❖ **मोटार परिवाहन विभाग :-**

पोलीस अधीक्षक पालघर आस्थापनेवरील सर्वात महत्वाची शाखा आहे. पोलीस अधीक्षक पालघर आस्थापनेवरील सर्व सरकारी वाहने यांची निगा राखणे, त्याची वेळच्या वेळी तपासणी करणे, वाहनात बिघाड झाल्यास वेळच्यावेळी दुरूस्त करून वाहन उपलब्ध करून देणे ही प्रभारी अधिकारी मोटार परिवाहन शाखा यांची जबाबदारी असते. नवीन वाहने पासिंग करून घेणे, संबधीत पोलीस ठाणे यांची वाहन मागणी असल्यात विहित वेळेत पुर्तता करणे. या प्रकारची कामे बघितली जातात. मोटार परिवहन विभाग अंतर्गत नौका विभाग सुदधा कार्यरत आहे. बोटींची देखभाल दूरूस्ती ते नौका विभागातील कार्यरत अंमलदार यांचे कामकाजावर लक्ष देणे तसेच सागरी सुरक्षाच्या दृष्टीने भाडयावर घेण्यात आलेल बोटी करार पदधतीने घेण्यात येतात.